# ऋणनिर्देश

हा शोधनिबंध सादर करताना मला अतिशय आनंद होत आहे. शिवाजी विद्यापीठाने हा शोधनिबंध तयार करण्याची मला सुवर्णसंधी उपलब्ध करून दिली त्याबद्दल मी प्रथमत: शिवाजी विद्यापीठाचे आभार मानतो.

माझ्या मार्गदर्शिका डॉ. श्रीमती जी. एस. पाटील यांचे या शोधनिबंधाच्या कामी अचूक व योग्य मार्गदर्शन लाभले. तसेच आपुलकी, मदत व सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा सदैव ऋणी राहीन. प्रस्तुतच्या संशोधनाला त्यांनी योग्य दिशा उपलब्ध करून दिली या बद्दल त्यांचे पुन:श्च मन:पूर्वक आभार मानतो.

शिक्षणशास्त्र विभागप्रमुख डॉ. एम.एस. पद्मिनी यांनी केलेल्या सहकार्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. शिक्षणशास्त्र विभागाच्या माजी विभागप्रमुख डॉ. श्रीमती सी.एम. येवले यांनीही वेळोवेळी जे मार्गदर्शन केले त्याबद्दल मी त्यांचाही ऋणी आहे.

शिक्षणशास्त्र विभागामधील मला लाभलेले इतर अनुभवी गुरूवर्य डॉ. श्रीमती पी.एस.पाटणकर, डॉ. श्रीमती एन. आर. सप्रे, श्रीमती आर. यु. संकपाळ यांचेही वेळोवेळी मार्गदर्शन व सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शिक्षणशास्त्र विभागाचे अधिव्याख्याते श्री. के. बी. पाटील यांनी या संशोधनासाठी विशेष मार्गदर्शन केले. यासाठी त्यांनी आपला जो अनमोल वेळ दिला त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

प्रस्तुतच्या संशोधनासाठी पर्यावरण संरक्षण आणि शिक्षण क्षेत्रातील विविध तज्ञांचे सहकार्य लाभले. या तज्ञांच्या मार्गदर्शनामुळे माझ्या कार्याला योग्य दिशा मिळाली म्हणून मी त्यांना धन्यवाद देतो. विश्व प्रकृती निधी, कोल्हापूर विभागाचे शिक्षणाधिकारी श्री. सुहास वायंगणकर यांनी या संशोधनासाठी विशेष मार्गदर्शन आणि सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे.

शिये हायस्कूल शिये, ता. करवीर, जिल्हा कोल्हापूर या शाळेचे मुख्याध्यापक श्री. एस. डी. पाटील यांनी संशोधन कार्याच्या अंमलबजावणीसाठी उत्स्फुर्तपणे शाळा उपलब्ध करून दिली आणि वेळोवेळी जे सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. तसेच या शाळेचे शिक्षक श्री. एम. एस. होलवान यांनी पर्यावरण शिक्षणाचे पारंपारिक पद्धतीने अध्यापन करून या संशोधनासाठी जे योगदान दिले त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे आणि हा संपूर्ण कार्यक्रम ज्या विद्यार्थ्यांवर राबविला गेला ते शिये हायस्कूल इयत्ता ६ वी तुकडी 'अ' आणि 'ब' च्या सर्व विद्यार्थ्यांनी मनापासून सहकार्य केले त्याबद्दल मी त्यांना धन्यवाद देतो.

कोल्हापूर शहरामधील कै. बी. जी. खराडे शिक्षणशास्त्र महाविद्यालयाच्या प्राचार्या श्रीमती सी. जी. खांडके यांनी या संशोधन कार्यासाठी वेळोवेळी मार्गदर्शन व प्रेरणा दिली त्याबद्दल मी त्यांचा ऋणी आहे.

शोधनिबंध अभ्यासाला गती मिळवून देण्यात शिक्षणशास्त्र विभागातील शिक्षकेतर कर्मचाऱ्यांचेही सहकार्य लाभले. तसेच शोधनिबंध पूर्ण करण्यामध्ये प्रत्यक्ष व अप्रत्यक्ष स्वरूपात अनेक व्यक्तीचें जे सहकार्य लाभले त्याबद्दल मी त्या सर्वांचे मन:पूर्वक आभार मानतो.

स्थळ : कोल्हापूर संशोधक

दिनांक :

श्री. शिवाजी बापुसोा गावडे
एम्.ए., एम्.एड्., सेट (शिक्षणशास्त्र)
कोल्हापूर.